महाराष्ट्र शासन

क्रमांक: पीईसी १९८४/
शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक : २१ जून १९८४.

प्रति,

सचिव,
श्री रामदेवबाबा स्मारक सार्वजनिक समिती,
नागपूर.

विषय :- अशासकीय संस्थांना विना अनुदान तत्वावर अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता ...

महोदय,

अभियांत्रिकी/तंत्रशास्त्रामध्ये पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासंबंधीच्या आपल्या अर्जासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, १९८४-८५ या शैक्षणिक वर्षापासून विना अनुदान तत्वावर अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यासाठी आपल्या संस्थेस खालील अटींवर परवानगी देण्यात येत आहे :-

[अ] शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक: टिइएम ३३८२/१११८३६/[१९०]/तांशि-१, [अ], दिनांक ३१ मे, १९८३ अन्वये अशा संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणांस मान्य असतील [सदर शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे.]

[ब] सुरु करावयाचे पदवी अभ्यासक्रम संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची मान्यता घेऊन निश्चित केले जातील.

[क] नागपूर विद्यापीठ अधिनियम १९७४ कलम ४३ अन्वये सदर महाविद्यालयाचे नागपूर विद्यापीठांशी संलग्नीकरण करण्यासाठी संस्थेने अर्ज केलेला असावा.

[ड] वरील [अ] व [ब] मध्ये अंतर्भूत असणारी कागदपत्रे औपचारिक बाबी या संस्थेद्वारे तंत्र शिक्षण संचालकांच्या सहमतीने, समाधानकारकरित्या पूर्ण करण्यात येतील व त्या नंतरच अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी अंतिम परवानगी व दिनांक तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून देण्यात येईल.

[इ] संस्थेने तयार केलेला प्रकल्प अहवाल हा अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या पश्चिम विभागीय समितीने स्वीकारलेला असावा व त्यास परिषदेची अंतिम स्वीकृती असावी. अशी स्वीकृती न मिळाल्यास महाविद्यालय बंद करावे

३. तेव्हा आपणास विनंती करण्यात येते की, आवश्यक त्या सर्व औपचारिक बाबी पूर्ण करण्यासाठी आपण त्वरीत तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, ३ महापालिका मार्ग, मुंबई-४०० ००१ यांच्याशी संपर्क साधावा. तसेच आपणास सूचित करण्यात येते की, तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई व नागपूर विद्यापीठ यांनी लेखी स्वरुपात अंतिम परवानगी दिल्याशिवाय आपण अभ्यासक्रमात प्रवेश देऊन सुरुवात करू नये.

आपला विश्वासू,

(स्वाक्षरी)

[ शि. वि. देऊस्कर ]

~~[illegible]~~ सचिव, महाराष्ट्र शासन.

अवर